पुष्पक

को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

रजि नंबर : (बी.ओ.एम./डब्ल्यु.एस./आर.एस.आर./सी.आर./८३७४/दि.३१/१२/९८)

परिवर्तनातून प्रगतीकडे

२६ वा
वार्षिक अहवाल
२०२३-२०२४

* प्रशासकीय कार्यालय *
१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८
022 2578 0236 / 7028000787
pushpakcr@gmail.com www.pushpaksociety.com

पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

श्री. व्हि. जी. पवार
मार्गदर्शक
संस्थापक : ज्ञानदीप को. ऑप. क्रे. सोसा.

श्री. गणपतराव पवार
अध्यक्ष

श्री. संभाजी पवार
उपाध्यक्ष

संचालक

श्री. परशुराम फडतरे

श्री. अंकुश संकपाळ

श्री. अर्जुन भोसले

श्री. नारायण कुदळे

श्री. व्यासदेव पवार

श्री. श्रीकांत कांबळे

सौ. शशिकला पवार

सौ. मिनाक्षी ढमाळ

श्री. नारायण पालवे

श्री. विनायक तळेकर

श्री. किरण पवार
मुख्यव्यवस्थापक

श्री. उध्दव भोसले
व्यवस्थापक

२६ वा वार्षिक अहवाल २०२३-२०२४

पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

२६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. १६ जून २०२४** रोजी **सकाळी ११ वाजता** संस्थेचे अध्यक्ष **मा. श्री. जी. ए. पवार** यांच्या अध्यक्षतेखाली **आम्रपाली बँक्वेट हॉल, युनिक आर्केड बिल्डींग, डॉन बॉस्को शाळेजवळ, टागोर नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ८३** येथे खालील कामकाजासाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे. ही विनंती.

सभेपुढील विषय

१) दि. १७ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील संस्थेच्या कामकाजाचा अहवाल नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक सादर करुन त्यास मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) शासकीय लेखापरिक्षकांकडून आलेल्या सन २०२३-२४ सालचा अहवाल वाचुन नोंद घेणे.
५) सन २०२४-२५ सालासाठी वैधानिक हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे.
६) सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकाप्रमाणे जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२४-२५ सालचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७) सन २०२२-२३ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकाने दिलेल्या अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
८) कर्ज निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.
९) पोटनियम दुरुस्तीबाबत.
१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

आपला सहकारी,
संभाजी गेनबा पवार
उपाध्यक्ष
संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

स्थळ : मुंबई - ४०० ०७८.
दिनांक : १८ मे २०२४

विशेष सुचना

१) गणसंख्येअभावी तहकुब झालेली सभा पोटनियमातील तरतुदीप्रमाणे त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
२) ज्या सभासदांना सूचना करावयाच्या असतील त्यांनी त्या लेखी दिनांक १४ जून २०२४ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात पाठवाव्यात. आयत्या वेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३) संस्थेची वार्षिक अहवालाची प्रत संस्थेची वेबसाईट www.pushpaksociety.com वर उपलब्ध आहे.
४) ज्या सभासदांनी आपला ई-मेल आयडी किंवा मोबाईल क्र. याबाबतची माहिती संस्थेत नोंद केली नसेल त्यांनी आपल्या जवळच्या संस्थेच्या शाखेत किंवा मोबाईल क्र. ७०२८०००७८७ वर सादर करावी.

अध्यक्षांचे मनोगत...

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

आपणा सर्वांना माझा मन:पुर्वक नमस्कार, आपल्या संस्थेचा २६ वा वार्षिक अहवाल सादर करताना २५ वर्षात ज्या काही घडामोडी घडल्या त्यांचा चित्रपट डोळ्यांसमोर उभा आहे आणि हे सर्व घडत असताना, मी या गोष्टींचा आनंदाने स्वीकार करत होतो. या सर्व घटनांचा मी स्वत: साक्षीदार म्हणून आज आपल्या समोर उभा आहे. २६ वर्ष म्हणजे खूप होतात. एका कळीचे फुलात रुपांतर होताना मी पाहिले आहे. या गोष्टींचे सौभाग्य मला प्राप्त झाले. यासाठी मी आपणा सर्वांचा आभारी आहे.

आता दिवसेंदिवस संस्था मोठी होत चालली आहे. आपल्या परिवारात अनेक नवीन सभासद येत आहेत आणि आपल्याशी एकरुप होत आहेत या सर्वांना आपण आपल्या संस्थेतर्फे मदतीचा हात देत आहोत जेणे करुन त्यांना येणाऱ्या अडचणींवर प्रभावीपणे मात करु शकतात आणि आज कितीतरी परिवार सुखाने आपल्या घरात राहत आहेत. त्यासाठीच नव-नवीन योजना राबवून लोकांना बचतीची सवय लावू पाहत आहे. जेणे करुन पुढील आयुष्यात त्यांना कोणासमोर हात पसरावे लागू नयेत. मुलांच्या शिक्षणासाठी लग्नासाठी लागणारा खर्च एकाच वेळी कसा उभा करायचा असा प्रश्न प्रत्येक वडीलांना पडत असतो. त्यासाठी त्यांना संस्था मदत करत असते. कोणत्याही आर्थिक प्रश्नासाठी संस्था लोकांच्या कार्यात उभी राहते. आणि म्हणूनच पुष्पक को-ऑप. क्रेडीट सोसायटी सहकार क्षेत्रात दिमाखात उभी आहे. एक नावलौकिक संपादन करुन जनमाणसांत वावरत आहे.

संस्थेने समाजाप्रती असलेली बांधिलकी प्रत्येक वेळी जपलेली आहे. तेव्हा सभासदांनी सुद्धा संस्थेप्रती असलेले आपले कर्तव्य विसरु नये. आपण घेतलेले कर्ज व त्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरत जावे. संस्थेला विनाकारण या गोष्टीसाठी त्रास देऊ नये. सभासदाने आपली जबाबदारी नीट पार पाडावी. कर्जाचे हप्ते वेळेवर भरुन स्वत: अडचणीत येणार नाही याची दक्षता घ्यावी. विनाकारण १०१ सारख्या कठोर कारवाई करण्यासाठी भाग पाडु नये. या कारवाई करताना संस्थेला सुध्दा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. त्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वागले म्हणजे कोणालाच अशा कठीण प्रसंगांना सामोरे जायची वेळ येणार नाही.

मागील दोन वर्षात संस्थेने सी.बी.एस. प्रणालीचा अवलंब केला आहे. कामाचे स्वरुप पुर्णपणे बदलले आहे. सभासदांना व्यवहार करताना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून काळजी घेत आहे. सभासदाला आपले व्यवहार पाहता यावेत म्हणून मोबाईल ॲप तयार केला आहे. प्रत्येक सभासदाने या योजनेचा लाभ घेतला पाहिजे. Online व्यवहार करता यावा यासाठी संस्थेने बँकेचे क्यू आर कोड घेऊन सभासदांपर्यंत पोचवले आहेत. जेणेकरुन त्यांना केवळ पैसे भरण्यासाठी किंवा घेण्यासाठी संस्थेत येण्याची वेळ येऊ नये. अजूनही नवीन संकल्पना राबविण्याचा संस्थेचा मानस आहे. त्यासाठी सभासदांचे सहकार्य अपेक्षित आहे.

संताच्या शिकवणीनुसार चालणारी आणि इतरांना सुद्धा मार्ग दाखवणारी पुष्पक को-ऑप. क्रेडीट सोसायटी आता एका नवीन वळणावर जाऊन उभी आहे आणि प्रत्येकाला सांगत आहे की आम्ही २५ वर्ष पूर्ण करुन येथे आलो आहोत. मागील रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करताना अनेक नव-नवीन उपक्रम राबविले गेले. रक्तदान शिबिर, मोफत वैद्यकीय तपासणी. लोकांना मनोरंजनासाठी "करुन गेलो गाव" हे नाटक वाशी येथे पार पाडले. तसेच मुलुंड येथे कालिदास नाट्यगृहात कार्तिकी एकादशी निमित्त "वारी सोहळा संताचा" हा एक आगळा वेगळा कार्यक्रम सादर करताना तर लोकांना प्रत्यक्ष नाही पण अप्रत्यक्षपणे पांडुरंगाचे दर्शन नक्कीच घडले. सभासदांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहुन आम्हा सर्वांना अगदी आनंदाश्रु अनावर झाले. आणि २५ वर्षाचे केलेले कष्ट सार्थकी लागले याची प्रचिती आली.

सभासदांना विनंती आहे की आपण येणाऱ्या अडचणी संस्थेत येऊन सांगाव्यात किंवा अजून काही माहिती हवी असल्यास आपल्या संस्थेच्या वेबसाईट वर उपलब्ध आहे त्यातून घ्यावी. सभासदांसाठी त्यांच्या कामासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहु याची ग्वाही मी व माझे संचालक मंडळ आपणांस देत आहोत. तसेच आपणा सर्वांच्या सेवेसाठी आमचा कर्मचारी वृंद व दैनंदिन ठेव प्रतिनिधी कायम सोबत आहेत व राहातील याचा विश्वास मी आपणांस देतो आणि मी माझे मनोगत पुर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

।। विना सहकार नाही उध्दार ।।

आपला हितचिंतक,

श्री. गणपतराव आनंदराव पवार

अध्यक्ष

वार्षिक कार्यवृत्तांत

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

संस्थेवर दर्शविलेल्या विश्वासाप्रती व संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीस सदैव पाठिंबा देणाऱ्या भागधारकांचा मी ऋणी आहे. प्रगतीमध्ये सातत्याने सहकार्य करणाऱ्या सभासदांच्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. संस्थेला सातत्याने प्रगती पथावर अग्रेसर ठेवण्यास संस्थेच्या सर्व कर्मचारीवृदांचे लाभत असलेले योगदान देखील आव्हानात्मक परिस्थितीत महत्वाचे ठरते. संस्थेच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत असणाऱ्या कर्मचारी वर्गाचे संचालक मंडळाच्या वतीने मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

संस्थेचा सन २०२३-२४ चा २६ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

संचालक मंडळ :

अहवाल सालात संचालक मंडळाच्या १७ सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती चांगली राहिली. संचालक मंडळाच्या सभेशिवाय इतर सामाजिक कामांमध्ये संचालक सदस्यांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. अशा प्रकारच्या कळकळीच्या सहकार्यामुळे संस्थेची प्रगती सतत होत आहे. संचालक मंडळातील सर्व संचालकांच्या सहकार्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभासद :

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस सभासद संख्या १३५२१ होती. यामध्ये प्रत्यक्षात २८२८ नविन सभासदांची नोंद झाली आहे. अहवाल सालात १९१ सभासदांनी राजीनामा दिले आहे. त्यामुळे अहवाल सालाअखेरीस संस्थेचे एकूण सभासद १६१५८ झाले आहेत. सभासदांनी ३१ मार्च २०२४ अखेर जमा असलेला भाग रक्कमेचे दाखले घेवून जावेत. मा. सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्या सुधारित परिपत्रकानुसार एका सभासदाला रु. ५ लाखांपर्यंत भाग खरेदी करता येतील. जास्तीत जास्त भाग खरेदी करुन संस्थेच्या विकासाला हातभार लावावा.

भागभांडवल :

संस्थेचे अहवाल सालच्या सुरुवातीस रु. ५,९४,१४,९००/- एवढे वसुल भागभांडवल होते. अहवाल सालात नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून जादा भागभांडवल रु. ६१,०६,९००/- वसुल झाल्याने वाढ झाली आहे. तसेच १९१ सभासदांनी राजीनामा दिल्याने रु. २१,६५,८००/- भागभांडवल कमी होऊन अहवाल सालाअखेर वसुल भागभांडवल रु. ६,३३,५६,०००/- एवढे झाले आहे. भागभांडवलात होणारी वाढ म्हणजेच सभासदांचा संस्थेवरील असलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे.

राखीव निधी :

गतवर्षीच्या रु. १,४५,३९,२२८/- निधीमध्ये नफ्यातून रु. २२,१७,९२८/- व आर्थिक वर्षात प्रवेश फी नाममात्र सभासद फी रु. २९,४४२/- न घेतलेला लाभांश असे रु. ८६,२२४/- अशी रु. २३,३३,५९४/- ने वाढ होऊन अहवाल सालाअखेर राखीव निधी रु. १,६८,७२,८२२/- झालेला आहे. निधीतील वाढीचे प्रमाण १६.२५% असुन निधीची कायद्यातील तरतुदीनुसार गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेच्या निधीत होणारी वाढ संस्थेचा पाया मजबूत करणारी आहे.

अन्य निधी :

गतवर्षी अन्य निधी रु. ४,१०,८५,३३३/- असुन व्याज रु. ५९,९२,३७२/- ने वाढ होवून मार्च २०२४ अखेर एकूण अन्य निधी रु. ४,७०,७७,७०३/- झालेला आहे. अन्य निधीतील वाढीचे प्रमाण १४.५९% आहे.

ठेवी :

संस्था देत असलेल्या ग्राहक सेवेमुळे तसेच संचालक मंडळ, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांच्या प्रयत्नाने व तुम्हां सर्वांच्या सहकार्याने संस्थेच्या ठेवीमध्ये भरघोस वाढ झाली आहे. ठेवी मध्ये वाढ करत असताना सभासदांच्या जास्तीत जास्त हिताचा व संस्थेच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन ठेवीला जास्तीत जास्त व्याज देण्याचा संचालक मंडळाने प्रयत्न केलेला आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये रु. १,४६,६९,८७,५५१/- जमा होते. अहवाल सालात ठेवीमध्ये रु. २,४१,८७,७९,३८६/- वाढ झाल्यामुळे वर्षअखेरीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये रु. १,८५,१०,९२,१६९/- जमा आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात ठेवीमध्ये २६.१८% वाढ झालेली आहे.

कर्ज :

सभासदांच्या आवश्यकतेनुसार व सुरक्षिततेचा विचार करुन जास्तीत जास्त सभासदांना अर्थ सहाय्य करण्याचा प्रयत्न केला आहे. चालू वर्षात सभासदांना रु. ८१,७२,५७,७८७/- कर्जाचे वाटप केलेले आहे. सहकार क्षेत्रातील स्पर्धा इतर आर्थिक संस्थाचे व्याजदर यामुळे चांगले कर्जदार सभासद संस्थेस सोडून जात आहेत याची दखल घेऊन कर्ज व्याजदरात विविधता आणली आहे. कमी रकमेचे व जास्तीत जास्त सभासदांना कर्ज वाटप करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहोत.

कर्ज हे संस्थेची मालमत्ता आहे. त्यातूनच संस्थेला उत्पन्न मिळत असते. चांगले कर्जदार मिळणे ही सुध्दा एक स्पर्धा आहे. या स्पर्धेत टिकाव धरुन संस्थेने चालू वर्षात भरीव कर्ज वितरण करुन कर्जामध्ये गतवर्षीच्या तुलनेत वाढ केलेली आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने महिलांना वैयक्तिक कर्ज संस्थेच्या शाखा स्तरावर देण्याची योजना चालू केली आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस रु. १,३५,४३,६५,६२४/- कर्ज येणे बाकी होते. अहवालसालात रु. ८१,७२,५७,७८७/- कर्ज वितरित केले असुन रु. ५३,१५,९५,२१४/- कर्ज वसुल झालेले आहे. मागील वर्षापेक्षा रु. २८,५६,६२,५७३/- ने कर्जामध्ये वाढ झाली असून वर्षा अखेरीस रु. १,६४,००,२८,१९७/- कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात येणे कर्जात २१.०९% वाढ झाली आहे.

थकबाकी व वसुली :

थकबाकी व वसुली सर्वच आर्थिक क्षेत्रा समोरील एक आव्हान आहे. या आव्हानांचा संस्था मुकाबला करुन थकबाकी कमी करण्याचा सतत प्रयत्न केला जात आहे. थकीत कर्जदारांशी थेट चर्चा करुन त्यांच्या आर्थिक स्थितीचा व अडचणीचा विचार करुन मार्ग काढण्यासाठीचा प्रयत्न आहे. मृत झालेल्या कर्जदार सभासदांना व्याज, दंडव्याज व वसुली खर्चात सवलत देऊन एक रकमी भरण्यास सदर खाते थकबाकीतून काढण्याचा सर्वतोपरी प्रयत्न होत आहे. चालू वर्षात थकबाकी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० कलम १०१ नुसार दावे दाखल केले आहेत.

संस्थेने आपली स्वतंत्र कर्ज वसुली यंत्रणा अधिक कार्यक्षम केली आहे. अनुत्पादीत कर्जे मर्यादित ठेवण्यासाठी आपल्या संस्थेने आटोकाट प्रयत्न केले आहेत. संस्थेचा स्वतंत्र कर्ज वसुली विभाग ही अनुत्पादित कर्जे कमी करण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे. संस्थेचे संचालक मंडळ, कर्ज वसुली अधिकारी व कर्मचारी सातत्याने थकीत कर्जदार व त्यांच्या जामिनदारांशी संपर्क साधुन कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

नफा :

आर्थिक क्षेत्रातील स्पर्धात्मक स्थितीत ठेवीवरील व कर्जावरील व्याजदर त्याप्रमाणात ठेवावे लागतात. संस्थेने कर्जामध्ये गुणात्मक वाढ करुन व गुंतवणूकीचे सुयोग्य नियोजन करुन जास्तीत जास्त नफा मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

अहवाल सालात निव्वळ नफा रु. १७,७६,६३३/- झाला असून त्यात मागील वर्षाचा नफा रु. २,४६६/- मिळवून विभागणीसाठी रु. १७,७९,०९९/- नफा आहे. सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

राखीव निधी	२५%	२४,४४,७७५/-
लाभांश भाग रक्कम वर प्रमाणात	१०%	५९,५८,८७८/-
सभासद कल्याण निधी		५०,०००/-
इमारत निधी		५,००,०००/-
कर्मचारी कल्याण निधी		२५,०००/-
बुडीत व संशयीत कर्ज निधी		८,००,०००/-
पुढील वर्षाकरीता शिल्लक		४४६/-
एकूण		**१७,७९,०९९/-**

लाभांश :

संस्था सभासदाचे हित जोपासताना संस्थेच्या आर्थिक आकडेवारीचा विचार करुन जास्तीत जास्त लाभांश देण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असतो. संचालक मंडळाने जाहीर केलेल्या भाग संकलन ठेव योजनेत अनेक सभासदांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. त्याचबरोबर संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने संचालक मंडळाने सभासदांना चालु वर्षात १०% दराने लाभांश वाटपास मंजुरी दिलेली आहे. आपण त्यास वार्षिक सभेत मंजुरी द्यावी अशी आपणांस विनंती आहे.

खेळते भांडवल :

गतवर्षी संस्थेचे खेळते भांडवल रु. १,७७,११,४५,३४७/- होते. त्यात रु. ३४,४३,५५,६४९/- ने वाढ होवून वर्षाअखेरीस खेळते भांडवल रु. २,११,५५,००,९९६/- झालेले आहे. अहवाल वर्षात खेळत्या भांडवलातील वाढ १९.४४% इतकी आहे. संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये सातत्याने होणारी वाढ संस्थेची आर्थिक प्रगती दर्शविते.

लेखा परिक्षण :

संस्थेच्या दि. १७/९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२३-२४ चे वैधानिक लेखा परिक्षण करण्यासाठी अधिकृत लेखापालांच्या सुचीमधून मे. गौतम गोखले ॲन्ड कंपनी, सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी लेखापरिक्षणाचे काम पूर्ण करुन अहवाल सादर केला आहे. संस्थेचे कामकाज व प्रगतीबाबत लेखापरिक्षक यांनी समाधान व्यक्त करुन संस्थेस सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग **अ** देण्यात आला आहे.

कर लेखापरिक्षण (टॅक्स) :

सन २०२२-२३ या अहवालसालाचे कर लेखापरिक्षण मा. श्री. वाय. एस. मुजुमदार आणि कंपनी सनदी लेखापाल मेंबर नं. ३३७०४ यांनी केले असून त्यांनी केलेल्या बहुमोल सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

प्रशिक्षण कार्यशाळा :

अहवाल सालात संस्थेची ध्येय धोरणे ठरवणे. उद्दिष्ट पुर्तीसाठी नियोजन करणे. कर्मचारी यांना अदयावत प्रशिक्षण देणे. यासाठी खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

लोणावळा : संचालक मंडळ धोरणात्मक सभा घेण्यात आली.

विक्रोळी : संचालक मंडळ व कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

खंडाळा : व्यक्तिमत्व विकास, कर्ज वसुली, पतसंस्थाचे कामकाज या विषयी प्रशिक्षण देण्यात आले. संचालक मंडळ व कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

संस्थेचे मार्गदर्शक व ज्ञानदीप को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे संस्थापक-संचालक मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब सातत्याने संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचे प्रशिक्षण घेत असतात. त्यांच्या प्रशिक्षणामुळे ठरविलेली उद्दिष्टे पूर्ण झाली याचा आम्हांला आनंद आहे. तसेच मुंबई सहकारी बोर्ड, महाराष्ट्र राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई यांच्या सहकार्याने वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. या कार्यक्रमांमध्ये उपस्थितांना मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे संस्थेच्या प्रगतीस चालना मिळाली.

कर्मचारी :

संस्थेतील अधिकारी तसेच सर्व कर्मचारी यांचेद्वारे अधिकाधिक चांगली ग्राहक सेवा देण्यासाठी, संस्था नेहमीच प्रयत्नशील असते. यावर्षी निरनिराळ्या पध्दतीची सांधिक/व्यक्तीगत उद्दीष्टे दिल्यामुळे शाखांतर्गत अधिकारी-कर्मचारी यांचेसाठी वैयक्तिक स्तरावरही व्यवसाय वृध्दीसाठी उत्साहवर्धक वातावरणात होते. अनेक अधिकारी व कर्मचारी यांनी जोमाने प्रयत्न करुन त्यांची व्यक्तीगत तसेच शाखांसाठीची सामुहिक उद्दिष्टे पूर्ण करण्यात यश मिळवले. त्यांचे हे प्रयत्न अभिमानास पात्र आहेत. संस्थेच्या वाढीबरोबर सभासदांचे संस्थेबद्दलचे प्रेम वृध्दींगत करण्याचे कार्य सर्व कर्मचारी करीत आहेत. दि. ३१ मार्च २०२४ अखेरीस संस्थेच्या सेवेत अधिकारी व कर्मचारी मिळून एकुण ५९ कर्मचारी कार्यरत आहेत.

ठेव प्रतिनिधी :

संस्थेत एकूण ९८ इतके ठेव प्रतिनिधी कार्यरत असून संस्थेस ठेव संकलन करणे. कर्ज वसुलीच्या कामात सहभाग घेणे व संस्थेविषयी प्रचार, प्रसिध्दी करणे अशी महत्वाची कामे त्यांच्याकडून केली जातात. मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब यांच्या धोरणानुसार प्रत्येक शाखेत किमान १० प्रतिनिधी असावेत. संचालक मंडळ व कर्मचारी यासाठी प्रयत्नशील आहे. इच्छुकांनी स्वयंस्फुर्तीने अशा कामासाठी संस्थेत कार्यरत असावे अशी संचालक मंडळाची अपेक्षा आहे.

सभासद अपघात विमा :

संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब यांच्या संकल्पनेतून संस्थेने आपल्या सर्व सभासदांसाठी व कर्जदारांसाठी न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. च्या माध्यमातून वैयक्तिक जनता अपघात विमा पॉलिसी अंतर्गत विमा संरक्षण उपलब्ध करुन दिले आहे. प्रत्येक सभासदांना विनामूल्य रु. १ लाख विमा संरक्षण दिले जाते.

आपला ग्राहक जाणून घ्या :

महाराष्ट्राच्या सहकार विभागाने सभासदांची KYC पूर्ण करण्यासाठी अनेक सुचना लागू केलेल्या आहेत. त्यांचे आपण पालन करीत आहोत. पुर्वीच्या सभासदांनी सुध्दा आपली KYC ची पुर्तता करावी असे आपणांस सुचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर संस्था बरेच व्यवहार सोशल मिडीया मार्फत चालवत आहेत. त्यामुळे आपण आपले अदयावत मोबाईल नं. द्यावेत.

संगणक प्रणाली :

संस्था अत्याधुनिक तंत्रज्ञान आणण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सभासदांना सुलभ व अचूक सेवा देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. भविष्याचा वेध घेऊन डिजीटल व्यवहार करण्यासाठी सभासदांना मोबाईल ॲप दिला आहे. यासाठी कॉमविझार्ड यांच्याकडून अदयावत संगणक प्रणाली घेण्यात आली असून संस्थेचा सर्व शाखा कोअर बँकींग सोलुशन (सी.बी.एस.) ने जोडण्यात आलेल्या आहेत. यामुळेच सभासदांना कोणत्याही शाखेतून व्यवहार करणे शक्य होत आहे. दैनंदिन ठेव सुध्दा मोबाईल ॲप द्वारे सर्व प्रतिनिधी मार्फत जमा केली जाते.

कोअर बँकिग :

अहवाल वर्षात संस्थेने सभासदांकरीता सुरु केलेल्या विविध डिजीटल सेवांमुळे संस्थेची जनमाणसातील प्रतिमा उंचावली आहे.

१. एस. एम. एस. सुविधा :

संस्थेने एस. एम. एस. सुविधा सुरु करुन सभासदांना खात्यामधील व्यवहाराची माहिती, ठेव मुदतपुर्ती दिनांक, खात्यावरील भरणा केलेली रक्कम, खात्यावरील जमा असलेली रक्कम, कर्ज हप्ता (ईएमआय) सुचना इत्यादी माहिती एस. एम. एस. सुविधेद्वारे देण्यात येते.

२. दैनंदिन ठेव ॲप :

संस्थेची दैनंदिन ठेव ही देखील संस्थेच्या मोबाईल ॲपद्वारे होत असुन त्याचा त्वरीत एस. एम. एस. खातेदाराला जात आहे. त्यामुळे त्यामध्ये देखील अचुकता आली आहे.

३. मोबाईल ॲप :

सभासदांना आपले संस्थेतील खात्यावरील व्यवहार त्वरीत करता यावेत व त्याची माहिती व्हावी याकरीता मोबाईल बँकींग ॲपची सुविधा चालु करण्यात आली आहे. त्यामधुन खातेदारांना त्वरीत व्यवहार करता येणे शक्य होणार आहे. खातेदार आपली रक्कम हस्तांतर, फोन बिल, गॅस बिल, लाईट बिल, टिव्ही रिचार्ज इत्यादी सेवांचा लाभ घेता येणार आहे.

४. आर. टी. जी. एस./एन. ई. एफ. टी. :

या प्रणालीद्वारे ग्राहकांना सशुल्क सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे खातेदारांची वेळेची व खर्चाची फार मोठी बचत होणार आहे.

५. शाखा कार्यालय शुभारंभ :

संस्थेने अहवाल सालात धनकवडी (पुणे) या ठिकाणी शाखेचा शुभारंभ करण्यात आला.

६. प्रशासकिय कार्यालय खरेदी :

संस्थेच्या प्रशासकिय कार्यालयासाठी "बिझनेस 78" कॉम्पलेक्स, हुमा सिनेमाजवळ, स्टेशन रोड, कांजुरमार्ग (प.), मुंबई-७८ येथे प्रशस्त अशी ९४० चौरस फुटाची स्वमालकीची जागा खरेदी करण्यात आली.

श्रध्दांजली :

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात व्यक्तींना संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हि ईश्वरचरणी प्रार्थना.

आभार :

संस्थेला सहकार क्षेत्रात नावलौकीक प्राप्त करुन देण्यासाठी सतत कार्यरत असणाऱ्या ठेव प्रतिनिधी, संचालक मंडळ व सभासद वर्ग यांचे मी मन:पुर्वक अभिनंदन करतो.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकारमंत्री, सर्व मंत्री, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे व त्यांचे सर्व अधिकारी वर्ग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुर्व उपनगरे (२), कोकण भवन, नवी मुंबई, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, त्यांचे सर्व अधिकारी तसेच मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था 'एस' विभाग, कोकण भवन, त्यांचे सर्व सहकारी, अधिकारी संस्था कार्यक्षेत्रातील सहकार खात्याचे विविध पदाधिकारी यांची संस्था ऋणी आहे. तसेच कामकाजास विशेष मदत करणारे मा. जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलिस निरीक्षक व त्यांचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांची संस्था ऋणी आहे.

मा. आ. प्रविण दरेकर - अध्यक्ष मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक, मा. शिवाजीराव नलावडे - अध्यक्ष बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन, सर्व सहकारी संचालक, मा. श्री. जे. एस. पवार - महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मा. अंकुश जाधव - संपादक पतसंस्था व्यवस्थापन डायरी, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ज्ञानदिप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., डीएमके जावली सहकारी बँक लि., मुंबई सहकारी बोर्ड तसेच संस्थेशी संलग्न असलेल्या सहकारी पतसंस्थाचे, सहकारी बँकाचे अध्यक्ष, पदाधिकारी व संचालक मंडळ यांची संस्था ऋणी आहे.

संस्थेचे कायदेविषयक सल्लागार, मालमत्ता व सोने यांचे मुल्यांकन करणारे व्हॅल्युअर, अंतर्गत हिशोब तपासनीस, वैधानिक लेखा परिक्षक यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल संस्था ऋणी आहे. संस्थेचे संगणक प्रणाली विकासक, मे. कॉमविझार्ड प्रणालीचे प्रदिप भाटीया व युसुफ सर यांचे सर्व कर्मचारी यांची संस्था ऋणी आहे.

एका अभिमानास्पद वळणावरुन संस्थेच्या प्रगतीचा प्रवास सुरु आहे. नव्या जबाबदाऱ्या, नवीन आकांक्षा, नवीन अपेक्षा, नव्या स्वप्नांच्या क्षितीजाकडे झेपावत असताना आपणां सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा ठेवून हा अहवाल पूर्ण करीत आहे.

आपला विनम्र,
गणपतराव आनंदराव पवार
अध्यक्ष

❀ परिशिष्ट - अ ❀

संस्थेचे नांव	:	**पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**
कार्यालय पत्ता	:	१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल. बी. एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८.
नोंदणी दिनांक	:	३१/१२/१९९८
नोंदणी क्रमांक	:	BOM/WS/RSR/CR/८३७४/१९९८
कार्यक्षेत्र	:	बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, सातारा, नगर जिल्ह्यापुरते.
सभासद संख्या	:	१६१५८
अधिकृत भाग भांडवल	:	१०,००,००,०००/-
वसुल भाग भांडवल	:	६,३३,५६,०००/-
राखीव व इतर निधी	:	६,३९,५०,५२५/-
ठेवी	:	१,८५,१०,९२,१६९/-
गुंतवणूका	:	३०,५७,२३,१२३/-
कर्जे	:	१,६४,००,२८,१९७/-
सी. डी. रेशो	:	७७.२८%
अहवाल वर्षात निव्वळ नफा	:	९७,७६,६३३/-
ऑडीट वर्ग	:	अ
खेळते भांडवल	:	२,११,५५,००,९९६/-
शाखा	:	१६ + १ मुख्यालय
कर्मचारी संख्या	:	५९
ठेव प्रतिनिधी	:	९८
संमिश्र व्यवसाय	:	३५० कोटी

BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2024

31/03/2023	Liabilities	Amount	31/03/2024
1,50,00,000.00	**Authorised Share Capital** अधिकृत भाग भांडवल		**10,00,00,000.00**
5,94,14,900.00	Paid up Share Capital वसुल भाग भांडवल	5,94,14,900.00	
---	Add - Rec. During the year अधिक अहवालसाली जमा	61,06,900.00	
---	Less - Refund During the year अहवालसाली परत	21,65,800.00	6,33,56,000.00
	Reserve & Other Funds राखीव व इतर निधी		
1,45,39,228.00	Reserve Fund राखीव निधी	1,68,43,380.00	
—	Enterance Fee प्रवेश फी	28,280.00	
—	B Class Member नाममात्र सभासद	1,162.00	1,68,72,822.00
1,42,01,978.00	Reserve for Bad & Doubtful Debts बुडीत कर्ज निधी	2,08,67,130.00	
2,27,51,131.00	Building Fund इमारत निधी	2,45,76,931.00	
4,62,491.00	Member Welfare Fund सभासद कल्याण निधी	5,12,491.00	
7,66,600.00	Staff Welfare Fund कर्मचारी कल्याण निधी	7,77,620.00	
1,03,131.00	Charitable Fund धर्मदाय निधी	3,43,531.00	
26,50,000.00	Standard Assets Prov. उत्पादीत कर्ज तरतूद	---	
1,50,000.00	Silver Jubilee Fund सिल्वर ज्युबिली फंड	---	4,70,77,703.00
	Deposits ठेवी		
8,25,97,979.00	Daily Deposits दैनंदिन ठेव	9,82,57,050.00	
5,50,74,537.00	Saving Deposits बचत ठेव	6,58,75,085.00	
1,57,64,592.00	Recurring Deposits आवर्त ठेव	2,42,01,613.00	
33,69,62,801.00	Fixed Deposits मुदत ठेव	43,39,34,014.00	
4,34,73,932.00	Double/Bonus Deposits दामदुप्पट/बोनस ठेव	4,09,03,831.00	
3,37,070.00	Agent Security Deposits प्रतिनिधी सुरक्षा ठेव	2,55,950.00	
29,12,74,765.00	Monthly Interest Deposits मासिक व्याज ठेव	32,75,30,965.00	
53,19,57,132.00	Shubarambh Deposits शुभारंभ ठेव	63,81,22,102.00	
8,96,32,449.00	Short Term Deposits अल्प मुदत ठेव	15,87,21,376.00	
38,84,072.00	Pushpanand Deposits पुष्पानंद ठेव	87,36,128.00	
17,85,406.00	Loan/Staff Security Deposits कर्ज सुरक्षा ठेव	22,28,149.00	
1,03,20,979.00	Lakpati Deposits लखपती ठेव	1,10,88,695.00	
7,05,750.00	Suvarna/Vidhyut Pushpa Deposits सुवर्ण/विद्युत पुष्प ठेव	3,24,750.00	
28,51,087.00	Pushpasamruddhi Deposits पुष्प समृध्दी ठेव	37,62,180.00	
3,65,000.00	Viman Pushpa Deposits विमान पुष्प ठेव	3,10,000.00	
---	Pratham Deposits प्रथम ठेव	3,68,40,281.00	1,85,10,92,169.00
3,56,23,596.00	**Borrowings** बँक ओडी खाते		8,62,79,277.00
	Other Liabilities इतर देणी व तरतुदी		
32,999.00	Surcharge Account सरचार्ज खाते	2,965.00	
9,950.00	Professional Tax (PT) व्यवसाय कर	10,000.00	
42,983.00	Insurance & Development Fund विकास निधी	14,550.00	
28,330.00	Tax Deducted at Source टी. डी. एस. खाते	33,894.00	
8,07,000.00	Audit Fee Payable ऑडीट फी देय	10,17,000.00	
1,45,178.00	Employees P. F. Contribution कर्मचारी पी. एफ.	1,96,868.00	12,75,277.00
29,57,485.00	Unclaimed Dividend न घेतलेला लाभांश		36,17,827.00
14,05,99,104.00	**Interest Payable** ठेवीवरील देणे व्याज		3,61,50,823.00
	P & L Appropration A/c नफा तोटा खाते	2,466.00	
88,71,712.00	Add : Current year profit अधिक चालू वर्षाचा नफा	97,76,633.00	97,79,099.00
1,77,11,45,347.00	**Total**		**2,11,55,00,997.00**

M/s. Gautam Gokhale & Co. (Chartered Accountant)

BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2024

31/03/2023	Assets	Amount	31/03/2024
	Cash & Bank Balance रोख व बँक शिल्लक		
13,13,663.00	Cash in Hand रोख शिल्लक	81,35,214.00	
46,20,000.00	Cash at Bank बँक शिल्लक	77,87,908.00	1,59,23,122.00
	Investments गुंतवणूक		
9,17,10,244.00	F.D. at M.D.C. Bank मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक	5,85,89,473.00	
10,69,29,928.00	F.D. at Jaoli/Satara Bank मुदत ठेव जावली/सातारा बँक	9,19,30,631.00	
2,75,56,455.00	F.D. at Sopan Bank मुदत ठेव सोपान बँक	7,40,30,925.00	
88,80,029.00	F.D. at Saraswat Bank मुदत ठेव सारस्वत बँक	40,83,661.00	
4,53,05,798.00	F.D. with Society मुदत ठेव सोसायटी	5,89,30,441.00	
1,39,43,173.00	F.D. at M.D.C.C. Bank (R/F) मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक	1,72,06,492.00	
9,21,000.00	Share with M.D.C. Bank भाग मुंबै बँक	9,21,000.00	
10,000.00	Share with K.S.S.K. Ltd. भाग साखर कारखाना	10,000.00	
1,000.00	Share with M.R.S.P. Fed. भाग महा. पतसंस्था फेडेरेशन	1,000.00	
9,500.00	Share with P.U.Z.P. Fed. भाग पूर्व उपनगरे फेडेरेशन	9,500.00	
10,000.00	Share with D.G.C. Ltd. भाग डी.जी.सी. लि.	10,000.00	30,57,23,123.00
	Security Deposits सुरक्षा अनामत		
13,320.00	Telephone Deposits टेलिफोन अनामत	13,320.00	
17,725.00	Electricity Deposits विज अनामत	17,725.00	
2,10,39,953.00	Office Building कार्यालय इमारत	2,10,39,953.00	
2,24,02,100.00	Building Security Depo. इमारत अनामत	2,23,02,100.00	
5,000.00	Security Depo. at BEST बी.ई.एस.टी. अनामत	5,000.00	
4,10,000.00	Office Deposits कार्यालय अनामत	5,10,000.00	
6,70,123.00	Security Depo. at Msed महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रीक बोर्ड	6,80,927.00	4,45,69,025.00
	Fixed Assets कायम स्वरुपी मालमत्ता		
1,10,397.00	Air Condition ए. सी.	82,798.00	
55,01,202.00	Furniture & Fixture फर्निचर व फिक्चर	57,82,173.00	
23,36,312.00	Computer Equipments संगणक	35,36,361.00	
1,56,747.00	Daily Collection Machine दै. कलेक्शन मशीन	1,17,562.00	
—	Vehicle Motor Cycle मोटर सायकल	90,750.00	96,09,644.00
	Loan कर्ज		
2,75,70,186.00	Personal Loan वैयक्तिक कर्ज	3,05,89,575.00	
2,03,31,530.00	Daily Personal Loan दै. ठेव वैयक्तिक कर्ज	2,00,71,572.00	
10,41,10,263.00	Group Personal Loan गट वैयक्तिक कर्ज	23,37,23,394.00	
8,11,45,002.00	Vehicle Loan वाहन कर्ज	4,72,77,754.00	
78,38,27,967.00	Business Loan व्यवसाय कर्ज	85,19,06,063.00	
12,71,59,457.00	Against Depo. Loan ठेव तारण कर्ज	14,80,95,938.00	
5,43,20,536.00	Security Personal Loan सुरक्षित वैयक्तिक कर्ज	5,21,60,008.00	
11,87,96,316.00	Arbitration Loan लवादी कर्ज	19,02,74,369.00	
---	Staff Vehicle Loan कर्मचारी वाहन कर्ज	18,75,352.00	
58,01,925.00	Staff Personal Loan कर्मचारी वैयक्तिक कर्ज	75,16,434.00	
2,16,54,723.00	Staff Housing Loan कर्मचारी गृहतारण कर्ज	3,85,24,087.00	
91,57,465.00	Gold Loan सोने तारण	1,31,73,205.00	
4,90,254.00	Agent Personal Loan एजंट वैयक्तिक कर्ज	48,40,446.00	1,64,00,28,197.00
5,95,13,107.00	**Int. Receivable** व्याज येणे		8,19,11,976.00
	Other Assets इतर मालमत्ता		
14,380.00	Adheshive Stamps अधेसिव्ह स्टॅम्प	25,020.00	
20,30,753.00	T.D.S. Receivable टी.डी.एस.	34,33,187.00	
12,83,314.00	Sainath Credit Society साईनाथ क्रे. सोसा.	11,54,983.00	
64,500.00	Advance कार्यालय जागा	1,31,22,720.00	1,77,35,910.00
1,77,11,45,347.00	**Total**		**2,11,55,00,997.00**

S. G. Pawar (Vice-Chairman) **G. A. Pawar** (Chairman)

PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2024

31/03/2023	Expenditure	Amount	31/03/2024
12,20,17,070.00	**Interest on Deposits** ठेवीवरील व्याज		14,52,37,968.00
16,90,590.00	**Interest on Bank Loan** बँक कर्जावरील व्याज		51,92,893.00
1,35,35,064.00	Salary पगार	2,17,35,425.00	
4,33,309.00	Stipend विद्यावेतन	13,46,288.00	
6,92,951.00	Bonus & Emp. Gratuity बोनस व कर्मचारी ग्रॅज्युटी	7,39,460.00	
15,93,897.00	Employee P. F. Exp. कर्मचारी पी. एफ. खर्च	22,39,998.00	2,60,61,171.00
1,57,785.00	Postage & Telegram पोस्टेज व टेलिग्राम	1,67,896.00	
6,78,205.00	Rents कार्यालय भाडे	8,82,399.00	
2,38,812.00	Travelling Exp. प्रवास खर्च	2,70,744.00	
3,33,819.00	Electricity Exp. वीज खर्च	3,94,618.00	
8,79,336.00	Insurance Exp. विमा खर्च	9,90,930.00	
2,08,121.00	Repair & Maintance दुरुस्ती खर्च	2,73,975.00	
5,15,900.00	Annual Maintanance Exp. वार्षिक देखभाल खर्च	1,59,937.00	
62,914.00	GST Exp. जी. एस. टी. खर्च	2,63,336.00	
1,00,431.00	Misc. Exp. किरकोळ खर्च	3,95,736.00	
12,655.00	News Paper वर्तमान पत्र	13,470.00	
4,12,351.00	Printing & Stationary छपाई स्टेशनरी खर्च	5,06,168.00	
62,137.00	Pooja Exp. पूजा खर्च	1,00,213.00	
2,52,897.00	Telephone Exp. टेलिफोन खर्च	2,21,079.00	
47,65,173.00	Commission Exp. कमिशन खर्च	58,09,254.00	
5,730.00	Legal Fees कायदेशीर शुल्क	2,560.00	
10,24,465.00	Loan Recovery Charges कर्ज वसुली खर्च	11,19,398.00	
55,859.00	Bank Charges बँक चार्जेस	67,433.00	
9,97,778.00	Audit Exp. लेखापरिक्षण फी	12,62,056.00	
1,11,346.00	Advertisement जाहिरात	1,24,535.00	
1,93,288.00	Professional Charges व्यवसाय खर्च	1,63,560.00	
4,07,441.00	Entertainment Exp. चहापान खर्च	5,48,134.00	
61,675.00	A. G. M. Exp. वार्षिक सभा खर्च	79,920.00	
96,559.00	Silver Jubilee Exp. सिल्वर ज्युबिली खर्च	12,72,293.00	
12,08,437.00	Recovery Charges वसुली खर्च	10,87,660.00	
8,000.00	Licence Fee परवाना शुल्क	8,620.00	
1,41,353.00	Cleaning Exp. साफसफाई खर्च	1,81,850.00	
38,484.00	Water Exp. पाणी बिल	99,094.00	
1,84,504.00	Training Exp. प्रशिक्षण खर्च	1,57,649.00	
74,260.00	Meeting Exp. सभा खर्च	70,500.00	
83,753.00	Branch Opening Exp. शाखा खर्च	54,292.00	
9,750.00	Subscription सदस्यता	1,250.00	
—	Pro For RBDD आरबीडीडी	5,00,000.00	
---	T.D.S. Exp. (Mseb) टॅक्स	38,547.00	1,72,89,107.00
13,50,928.00	**Deprication** घसारा		18,70,214.00
88,66,797.00	**Profit & Loss A/c** नफा तोटा खाते		97,76,633.00
16,35,63,824.00	**Total**		**20,54,27,985.00**

M/s. Gautam Gokhale & Co. (Chartered Accountant)

PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2024

31/03/2023	Income	Amount	31/03/2024
1,68,56,554.00	Interest on Bank Deposit ठेवीवरील व्याज	2,10,49,311.00	
14,16,05,808.00	Interest on Loan कर्जावरील व्याज	18,08,70,547.00	20,19,19,858.00
25,38,069.00	Misc. Income किरकोळ जमा	16,68,557.00	
2,11,603.00	M.s.e.d. Commission एम. एस. ई. डी. कमिशन	2,31,059.00	
23,51,790.00	Processing Charges सर्व्हिस चार्ज	15,62,556.00	
---	Dividend on M.D.C. Bank लाभांश मुंबै बँक	45,955.00	35,08,127.00
16,35,63,824.00	**Total**		**20,54,27,985.00**

S. G. Pawar (Vice-Chairman) G. A. Pawar (Chairman)

❊ अंदाजपत्रक २०२४-२५ ❊

	अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज		अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज
भांडवल व देणी	सन २३/२४	सन २३/२४	सन २४/२५	मालमत्ता व येणी	सन २३/२४	सन २३/२४	सन २४/२५
वसुल भाग भांडवल	७१२९७८८०	६३३५६०००	७०९५८७२०	रोख व बँक शिल्लक	६८२३७१२	१५९२३१२२	११९०३९०२
राखीव व इतर निधी	६३९६८२४२	६३९५०५२५	७३५४३१०४	गुंतवणुक	३६९०९६४०९	३०५७२३१२३	४०६६११७५४
सभासद ठेवी	१६८७०३५६८४	१८५१०९२१६९	२२८६०९८८२९	सभासद कर्ज	१५३०४३३१५५	१६४००२८११७	२०००८३४४००
ठेवीवरील व्याज तरतुद	१५८६८२४८६	३६१५०८२३	४१२११९३८	कायम व इतर मालमत्ता	९०४७५७९	९६०९६४४	१०५७०६०८
इतर येणी व तरतुदी	३८५२४५३८	८७५५४५५४	९२६७०१४५	सुरक्षा अनामत/कार्यालय	४७७६८४६१	४४५६९०२५	४९०२५९२८
लाभांश देणे बाकी	३३१२३८३	३६१७८२७	४०५११६६	ठेवीवरील येणे व्याज	६६०५९५४९	८११९११७६	८९२८४०५४
एकूण नफा	९९३६३१७	९७७९०९९	११२४५९६४	इतर येणी	३५२८६६५	१७७३५९१०	३५५००२०
एकूण	**२०३२७५७५३०**	**२११५५००११७**	**२५७९७८०६६६**	**एकूण**	**२०३२७५७५३०**	**२११५५००११७**	**२५७९७८०६६६**

	अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज		अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज
खर्च तपशील	सन २३/२४	सन २३/२४	सन २४/२५	जमा तपशील	सन २३/२४	सन २३/२४	सन २४/२५
ठेवीवरील व्याज	१४०३११६३१	१४५२३७९६८	१६७०२३६६३	कर्जावरील व्याज	१६२८४६६७९	१८०८७०५४७	२०८००११२९
बँक कर्ज व्याज	२२७२२२५	५११२८९३	५९७१८२७	इतर उत्पन्न	५८६६६८१	३४६२१७२	३९८१४९८
पगार व इतर भत्ते	१८६९३५०४	२६०६११७१	२९९७०३४७	बँक लाभांश	०	४५९५५	४८२५३
प्रशासकीय खर्च	१५३९०७०१	१७२८९१०६	१९९६८५५१	गुंतवणुकीवरील व्याज	१९३८५०३७	२१०४९३११	२४२०६७०८
तरतुदी व इतर खर्च	१४८६०२१	१८७०२१४	२०५७२३५				
नफा	९९३६३१७	९७७६६३३	११२४५९६४				
एकूण	**१८८०९८३९८**	**२०५४२७९८५**	**२३६२३७५८७**	**एकूण**	**१८८०९८३९८**	**२०५४२७९८५**	**२३६२३७५८७**

❀ नमुना 'एन-२' ❀

(कलम ८१ आणि नियम ६९ (३) नुसार)

प्रति,
अध्यक्ष
पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग,
कांजुरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८.

आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैद्यानिक लेखापरिक्षण अभिप्राय :

१. पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई या संस्थेचे दि. १/४/२०२३ ते ३१/३/२०२४ या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण केलेले असून, त्यामध्ये दि. १/४/२०२३ ते ३१/३/२०२४ या दिनांकाचा ताळेबंद व त्या दिनांकास संपणारे नफा-तोटा पत्रक आणि त्यात समाविष्ट केलेल्या हिशोबांच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेले नियमान्वये आर्थिक विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा चुक यामुळे होणाऱ्या लक्षनीय चुकांपासून मुक्त राहतील, अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

लेखापरिक्षकांची जबाबदारी :

३. आर्थिक पत्रके बनविणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या तपासणीसाठी लागू असलेले मान दंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरुन केलेली आहे. ह्या मापदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची अकानी व अमंलबजावणी अशा प्रकारे करावी की ज्या येणे हिशोबात लक्षणीय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण अशी खात्री पटेल.

४. लेखापरिक्षणामध्ये उघड न झालेले दोष आणि रक्कम यातील पुरावा जमा करण्याची पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरण पत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनीयोजनेच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षणामध्ये जमा खर्चाच्या मुल्यांकनाच्या विनीयोजनेचा वापर आणि जमा खर्चाचा अंदाज त्याप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरण पत्रकांचे सादरीकरण याचा समावेश आहे.

५. आमच्या लेखापरिक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

अभिप्राय :

६. आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेली टिपणी व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६०, नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थासाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

   १. ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/३/२०२४ ची स्थिती आणि

   २. नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचे अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ, ब आणि क मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अभिप्राय :

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तयार करण्यात आलेली आहेत.

मी अहवाल करतो की :

८. अ. लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीनुसार व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते पुरेसे आहेत.

   ब. आमच्या तपासणीतून जीतपत दृष्टीपत्तीस येईल त्यावरुन संस्थेने कायद्यानुसार आवश्यक ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

   क. संस्थेच्या शाखांचे हिशोबाची तपासणी करुन आलेले शाखा लेखापरिक्षकांचे अहवाल हे आमचा लेखापरिक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेण्यात आलेले आहेत.

   ड. संस्थेस चालू तपासणी कालावधी सन २०२३-२४ या वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यात आलेला आहे.

सही,
मे. गौतम गोखले ॲन्ड कंपनी
सनदी लेखापाल
सहकारी संस्था, पॅनल क्र. १७५०४

दिनांक : २५ मे २०२४

❊ पोटनियम दुरुस्ती ❊

पो. क्र.	अस्तित्वात असलेली शब्दरचना	दुरुस्ती नंतरची शब्दरचना	दुरुस्तीचे कारण
अ.२.१	वार्षिक साधारण सभा व विशेष साधारण सभेची सूचना - १. वार्षिक साधारण सभा १४ दिवस अगोदर लेखी स्वरुपात सर्व सभासदांना सूचना देवून बोलावली जाईल.	वार्षिक साधारण सभा व विशेष साधारण सभेची सूचना - १. वार्षिक साधारण सभेची सूचना १४ दिवस अगोदर वर्तमानपत्र व समाज माध्यमाद्वारे (Social Media) प्रसिध्द करण्यात येवून बोलावली जाईल.	संस्थेची सभासद संख्या जवळ पास १६ हजार असल्यामुळे नोटीस पोस्ट करणे. वेळखाऊ व खर्चिक आहे.
	२. विशेष साधारण सभा ७ दिवस अगोदर लेखी स्वरुपात सर्व सभासदांना सूचना देवून बोलावली जाईल.	२. विशेष साधारण सभेची सूचना ७ दिवस अगोदर वर्तमानपत्र व समाज माध्यमाद्वारे (Social Media) प्रसिध्द करण्यात येवून बोलावली जाईल.	संस्थेची सभासद संख्या १६ हजाराच्या वर असल्यामुळे नोटीस पोस्ट करणे वेळखाऊ व खर्चिक आहे.
७	एका सभासदास जास्तीत जास्त रु. २,००,०००/- (अक्षरी रु. दोन लाख) पर्यंत भागाची रक्कम खरेदी करता येईल.	एका सभासदास जास्तीत जास्त रु. ५,००,०००/- (अक्षरी रु. पाच लाख) पर्यंत भागाची रक्कम खरेदी करता येईल.	मा. सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्या सुधारित परिपत्रकानुसार

❊ पुष्पक प्रगती अहवाल ❊

तपशील	मार्च २०१९	मार्च २०२०	मार्च २०२१	मार्च २०२२	मार्च २०२३	मार्च २०२४
सभासद	६३७२	८३७३	९५७३	११३४०	१३५२१	१६१५८
वसुल भाग भांडवल	३११७११००	४२४४५६००	४५२०७८००	४६०५८७००	५९४१४९००	६३३५६०००
राखीव व इतर निधी	३९८९२३१०	४४४३९००७	४७३२४६६७	४८८००८२४	५५६२४५५९	६३९५०५२५
एकूण ठेव	९२०००५७५७	१०३७६१०५७७	१०८७४८४४०१	१२४५५५१२४७	१४६६९८७५५१	१८५१०९२१६९
कर्ज येणे	९०५२९३१३३	१०२४७५६८७२	१०७७१२८९१३	११९९००४२४१	१३५४३६५६२४	१६४००२८११७
गुंतवणूक	११६५५६१६२	२०५७१२४८३	२१७८१८०८०	२४२७७९९०५	२९५२७७१२७	३०५७२३१२३
निव्वळ नफा	५९१२४८५	५९९४९४८	४६९००८२	७६४८४८८	८८६६७९७	९७७६६३३
लाभांश	१३%	१०%	८%	८%	१०%	१०%*
खेळते भांडवल	११६७१८३४७४	१३२०२८३०२७	१३८९८७४९६४	१५४३५५६४५३	१७७११४५३४७	२११५५००९९६
ऑडिट वर्ग	अ	अ	अ	अ	अ	अ
कर्मचारी व प्रतिनिधी	१११	१२०	११९	११३	१५२	१५७

पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

रौप्य महोत्सवी सांगता समारंभानिमित्त आयोजित वारी सोहळा संतांचा या नृत्याविष्कार कार्यक्रमाची क्षणचित्रे

कवी संम्मेलन व व्याख्यान कार्यक्रम क्षणचित्रे

धनकवडी (पुणे) शाखा कार्यालय उद्घाटन समारंभ क्षणचित्रे

संस्थेची शाखा कार्यालये

कांजुरमार्ग शाखा : १५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई-४०० ०७८. मोबा. : ७०२८० ००७०१ /७०२८० ००७८७	**चेंबुर शाखा** : गाळा नं. १, जय हनुमान को. ऑप. हौसिंग सोसा., भुजबळवाडी, घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, शिवाजीनगर सिग्नल जवळ, गोवंडी, मुंबई-४०० ०४३ * मोबा.: ७०२८० ००७०२
मुलुंड शाखा : कामाक्षी बिल्डींग समोर, रामगड नगर, गोशाला रोड, मुलूंड (प.), मुंबई-४०० ०८०. * मोबा.: ७०२८० ००७०३	**जुईनगर (नवी मुंबई) शाखा** : शॉप नं. ९, पौरस छाया, गावदेवी चौक, सेक्टर २४, जुईनगर (पू.), मुंबई-४०० ७०५. * मोबा. : ७०२८० ००७०४
लोणंद शाखा : राधाकृष्ण बिल्डींग, जैन मंदिर समोर, लोणंद-खंडाळा रोड, ता. खंडाळा, जि. सातारा-४१५ ५२१. * मोबा. ७०२८० ००७०५	**ठाणे शाखा** : श्री स्वामी समर्थ मंदिरासमोर, डवले नगर, पाडा नं. ३, लोकमान्य नगर, ठाणे (प.)-४०० ६०६. * मोबा. ७०२८० ००७०६
साकीनाका शाखा : रूम नं. ३१, शिवदर्शन सोसायटी, शिवाजी नगर, साकीनाका, कुर्ला (पं.), मुंबई-४०० ०७२. * मोबा. : ७०२८० ००७०७	**सातारा शाखा** : गाळा नं. यु.जी-७, सेंच्युरी बझार, जिल्हा परिषद समोर, सदर बझार, सातारा-४१५ ००१ * मोबा. : ७०२८० ००७०८
खंडाळा शाखा : यशोमा बिल्डींग, तहसील ऑफीसजवळ, लोणंद-खंडाळा रोड, खंडाळा,ता. खंडाळा, जि. सातारा-४१२ ८०२. * मोबा. : ७०२८० ००७०९	**काळेवाडी (पुणे) शाखा** : ९३५, ओमकार कॉलनी, विजय नगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे-४१३ ८०१.मोबा. : ७०२८० ००७१५
नायगांव शाखा : शॉप नं. ६, वुलर कॉम्प्लेक्स, ऋषी वाल्मिकी विद्यालय, नायगांव (प.), ता. वसई, जि. पालघर-४०१ २०७. मोबा. : ७०२८० ००७१६	**वाई शाखा** : शॉप नं. १४, कृषी उत्पन्न बाजार समिती, यशवंत नगर, वाई, जि. सातारा-४१२ ८०३ * मोबा. : ७०२८० ००७१९
विंग (सातारा) शाखा : एस. टी. स्टॅण्ड बाजूला, मु. पो. विंग, ता. खंडाळा, जि. सातारा-४१२ ८०१. * मोबा. ७०२८० ००७७१	**परेल शाखा** : डी-१०८, श्री गणेश साई एस.आर.ए. को. ऑप. हौ. सोसा. पहिला माळा, भोईवाडा, परेल, मुंबई-४०० ०१२. * मोबा. ७०२८० ००७५५
नऱ्हे (पुणे) शाखा : शॉप नं. ६, सर्व्हे नं. ५, आई कॉम्प्लेक्स, सावतामाळी मंदिराजवळ,भुमकरनगर, नऱ्हे, पुणे-४११ ०४१.* मोबा. ७०२८० ००७२६	**धनकवडी शाखा** : अथर्व पुरम बिल्डिंग, शॉप नं. १४, कोणार्क विहार, बस स्टॉप समोर, धनकवडी, पुणे -४११ ०४३.* मोबा. ७०२८० ००७३२

पुष्पक परिवार

Matoshree Design : 9082204814

पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

प्रशासकीय कार्यालय : १५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८

☎ ०२२ २५७८ ०२३६ / ७०२८०००७८७

www.pushpaksociety.com pushpakcr@gmail.com

बुक - पोष्ट

प्रति,
श्री./श्रीमती ______________

____

____